# बिइंग वुमन

Pune's only Fortnightly for Women

Price Rs. 18/- Pages 4 RNI No. MAHMAR/2019/78753

Pune - Year 3, Issue 5 - 1 to 15 February 2022 (Fortnightly)

१ फेब्रुवारी - भारतीय कोस्टगार्ड दिवस
४ फेब्रुवारी - जागतिक कर्करोग दिवस
८ फेब्रुवारी - जागतिक कडधान्य दिवस
११ फेब्रुवारी - विज्ञानातील महिला आणि मुलींचा आंतरराष्ट्रीय दिवस
१३ फेब्रुवारी - जागतिक रेडियो दिवस






लीना यादव, पुणे
editorial@thebeingwoman.com

# प्रेमाचा मोरपिशी दिवस

प्रेम म्हटलं की कृष्ण आठवतोच आणि कृष्ण म्हटलं की मोरपीस! प्रेमाचे क्षण मोरपिशीच असतात ना म्हणून म्हटलं प्रेमाचा मोरपिशी दिवस. आज प्रेमदिनी प्रेमाची अनेक रूपं न्याहाळताना प्रथम मनात अवतरला तो कृष्णरंग. मोहक निळाई. ही निळाई मोहमयी काव्य घडवते देहात आणि डोळ्यात मोर नाचतात. अनंत डोळे फुटतात त्या मोरपंखांना. त्यांना दिसतं ते फक्त प्रेमच.

प्रेम जडलं की अंतर्बाह्य स्वरूपच बदलून जातं त्या त्या जीवाचं. माणसाचंच असं नाही. निसर्गातली प्रत्येक वैभवी अस्तित्वं ही फक्त ह्या प्रेममयी निरागसतेनं स्वतःला समर्पित करतात या अनंत अवकाशात. शिशिराच्या बोचऱ्या थंडीत होणारी झाडांची पानगळ, मायेने या वसुंधरेवर उबेचं पांघरूण घालत असते. तिच्या कायेला जपण्यासाठी आपला देह झाडून तिच्या देहावर देह अंथरतात ही झाडं. एखाद्या स्वयंभू शिवलिंगावर अनंत काळ अभिषेक करणारा जलस्रोत पाहिलाय ना तुम्ही. कुठल्या मायेचं हे जग. ना कुठली वाच्यता ना कुठला युगायुगांचा शीण. सतत देहसमर्पण. अविरत वाहती अमर्याद प्रितीची अर्घ्ये.

जगणं सुंदर करणारी विलक्षण विलक्षण अद्भुत किमया म्हणजे प्रेम. गर्भात बीज रुजलं की हळूवार पोटावरून हात फिरवणारी आई. ती प्रेमात असते त्या बाळाच्या. त्याची क्षणोक्षणी वाट पहात असते. ते बाळ जन्माला येतं तेव्हा डोळेभरून आपलाच अंश न्याहाळते. त्याला गोंजारते, कुरवाळते. गालावर गाल घासते. किती हजारदा गोड मुके घेते त्या तान्हुल्याचे. किती गोंडस दिसतात ती रूपं तेव्हा. ते बाळही वात्सल्याच्या आधीन असतं आणि ती आईही. वेल्हाळ दिसतात ना मायलेकरं. एक मधुर ओलावा झिरपत असतो या प्रेमात पडलेल्या जीवांच्या रंध्रारंध्रातून.



अवघं आयुष्य भारून टाकण्याची अपार मंत्रशक्ती प्रेमात सामावलेली आहे. प्रेम आहे निसर्गाच्या प्रत्येक संरचनेचा आद्यस्तंभ. विराट ब्रम्हांडाचा श्वास. म्हणून तर हे निसर्गचक्र अविरत फिरतं. मूक प्रेम करतात ही नक्षत्रं एकमेकांवर.

मायेने, करुणेने जे जिंकता येतं ते कुणाला शस्त्रअस्त्रांचा धाक दाखवूनही जिंकता येत नाही. भक्तीच्या वाटेवर जे 'आर्त' साधकाला भिडतं ते प्रेमच. ज्ञानेश्वर म्हणतात तसं, 'विश्वाचे जे आर्त माझ्या मनी प्रकाशले.' त्यांच्या हृदयी समस्त चराचर सृष्टीबद्दल अपार करुणा पाझरू लागली आणि त्यांनी हे शब्द लिहिले. त्यांच्या भावभक्तीची अवस्था इतकी परमोच्च बिंदूवर पोहचली की नकळत ते गौळण लिहितात. 'भवतारकु हा कान्हा वेगी भेटवा गे। चांदवो चांदणे। चापे वो चंदनु। देवकीनंदनु वीण अणू नावडे वो।। केवढी ही आर्तता. ही निव्वळ भक्ती नाही. हा प्रेमभक्तीरस.

प्रेमाची असंख्य रूपं आहेत.. ती कधी मातृपितृ वात्सल्यातून दिसतात तर कधी चांदण्याच्या झुल्यावर झुलणाऱ्या प्रियकर प्रेयसीच्या मुग्ध मिठीतून. एखाद्या गाय वासराच्या हालचालीतून तर कधी बाबाकडे हट्ट करणाऱ्या, गाल फुगवून मुसमुसणाऱ्या छोट्याश्या लेकीच्या अश्रूंतून. संसार सजवणाऱ्या पत्नीच्या रुपातून, आजीच्या सुती पदरातून. मऊ रांधलेल्या स्वयंपाकातून जे काही ओघळतं स्निग्ध, सौम्य, मधाळ जठराग्नी शांतवणारं ते सगळं प्रेमच ना हो.

'मेरे तो गिरिधर गोपाल दुसरा न कोई' हे म्हणणारी 'मीरा' तिच्या कित्येक हजार वर्ष आधी जन्माला आलेल्या कृष्णावर फक्त त्याची मूर्ती छातीशी धरून कसं हो प्रेम करते. वाळवंटाच्या रूक्ष प्रांगणात हे प्रीतीचं चांदणं कसं नभाळून येतं. सगळे अडथळे, उंबरठे ओलांडून ती मीरा कृष्णमय होते. कुठल्याही विषाची बाधा तिला होत नाही. ते विष निष्प्रभ होतं इतकी मधुराप्रिती तिच्या आत विलसत असते. जगाचं भान विसरून कृष्णावर वेड्यासारखं प्रेम करणारी ही मीरा कळायला देहापल्याड जावं लागतं.

'शबरीची माया' तिची उष्टी बोरं खाल्ली ना रामरायाने. किती ही रूपं एकाच भावनेची. कृष्णावर प्रेम करणारं अवघं गोकुळ, त्याच्या बाळलीला पाहण्यासाठी आतुर गवळणी, रास खेळताना भान हरपलेल्या गोपिका, अनयाशी लग्न होऊनही कृष्णराधा राधाकृष्ण म्हणून जी निव्वळ कृष्णमय झाली ती राधा. अगदी वेगळं उदाहरण घेऊया का? आपल्या नृत्य कलेवर आकंठ प्रेम करणारी सुधाचंद्रन. पायाच्या अधूपणावर मात करते नृत्य प्रेमातून. इतकी जिद्द यायला तितकं प्रेम असावं लागतं ना आपल्या कलेवर, श्रद्धा स्थानावर. मग ते काहीही असो. ते मातीत रूजवलेलं एखादं रोपटं असो वा एखादी कला किंवा प्रियकर असो वा आराध्य दैवत. जीव ओतावा लागतो. देशासाठी आपलं सर्वस्व पणाला लावणारे जवान त्यांच्या देशप्रेमाला तोडच नाही. आपल्या माणसांसाठी स्वराज्याचं स्वप्न पाहणारे शिवराय, या मातृभूमीसाठी जन्म वाहून घेण्याची वृत्ती कुठून झिरपली त्यांच्या रक्तात? प्रेमच ना हे! या प्रेमाला कुठल्या एका व्याख्येत मांडता येतच नाही.

या अलौकिक उर्जांच्या मूळाशी जी स्पंदनं असतात ती म्हणजे प्रेम, माया. ऋतूंचं बदलणं, प्राजक्ताचं बहरणं, चाफ्याचा कोवळा रंग, दवबिंदूंच ओघळणं, चांदण्याचं टिमटिमणं, सूर्याचं नित्य तेजाळणं, पृथ्वीचं त्याच्या कक्षेत फिरणं ह्या सगळ्याच्या अंतरंगी आहे ते एकच माधुर्य,

**उर्वरीत पान ४ वर ...**






बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women

## थोडक्यात...



**रोहिणी वांजपे,** संपादक - बिइंग वुमन
editorial@thebeingwoman.com

नमस्कार! 'बिइंग वुमन'मध्ये सर्वांचे स्वागत आहे.

तुम मुझे भूल भी जाओ तो ये हक हैं तुमको...
मेरी बात और हैं, मैने तो मुहब्बत की हैं...'

अशा प्रेमाची भावना घेऊन येणारा तरुणाईचा व्हॅलेंटाईन डे जवळ आला आहे. प्रेमाचा उत्सव म्हणून पाश्चात्त्य देशात हा दिवस साजरा करतात. आपणही हा उत्सव काही प्रमाणात साजरा करून शुभेच्छा देतो. 'ढाई अक्षर प्रेमके...' ह्या हिंदी कवितेच्या ओळी आठवल्या. कितीतरी वर्षांपूर्वी प्रेमाचे महत्त्व सांगितले आहे. गेल्या दोन वर्षात माणसातील नाते संबंधात खूप दुरावा निर्माण झालेला होता. प्रत्यक्ष भेटणे होत नव्हते. त्याला काहीच पर्याय नव्हता. पण कोणत्या ना कोणत्या रूपाने फोनवरून संवाद साधत होतो; मदत करत होतो.

'स्त्री' हा अनेक भावना सामावलेला शब्द आहे आणि प्रेम हे ती तिच्या अनेक कृतीतून व्यक्त होत असते. 'बिइंग वुमन'ने एक स्पर्धा आयोजित केली आहे, ती म्हणजे 'गोष्ट पहिल्या प्रेमाची.' हे प्रेम मग कोणतेही असो. ह्या प्रेमाची वेगवेगळी रूपं 'स्त्री'च्या रूपातून दिसतात. आई, बहीण पत्नी, प्रेयसी, आजी, सासू ही तर तिची रूपे आहेतच पण मावशी, काकू, मामी, आत्या, मैत्रीण अगदी तुमची शेजारीण मैत्रीण अशा असंख्य रूपातून स्त्री आपले प्रेम व्यक्त करते. अगदी जेवणाच्या डबा देणे, त्यात एखादे चॉकलेट देऊन किंवा घरी आल्यावर चहाचा कप हातात देताना एखादी सरप्राईज डिश देणे असंख्य गोष्टीतून ती आपली प्रेम भावना व्यक्त करते, तर अशा या स्पर्धेच्या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे.

दोन महत्वाच्या व्यक्तीविषयी लेख आहेत जे आज आपल्यात नाहीत; पण त्यांच्या अनेक आठवणी आहेत. कीर्ती शिलेदारांची नाट्य गीतं ऐकत मोठी झाले आणि खूप वर्षांपूर्वी अनिल अवचट यांच्या एका पुस्तकाच्या रेकॉर्डिंगच्या निमित्ताने ओळख झाली होती. 'बिइंग वुमन'चा एक अनोखा इव्हेंट म्हणजे पुणे मेट्रो संवाद. संक्रांतीच्या हळदी कुंकवाचे निमित्त आणि तेही पुण्याच्या गरवारे कॉलेजच्या मेट्रो स्टेशनवर. तर सर्वांना आग्रहाचे निमंत्रण आहे. या कार्यक्रमात काही वर्कशॉप आहेत आणि मेट्रो स्टेशन बघू शकता बिनधास्तपणे. मेट्रोचा डबा पण असेलच.

बिइंग वुमनचा उद्देशच हा आहे की, अशा समारंभाच्या आयोजनाने स्त्रियांच्या बिझिनेसची वाढ व्हावी; त्यांना नवे व्यासपीठ मिळावे खूप लोकांशी त्यांचा परिचय व्हावा.

बिइंग वुमनचा अंक सर्वांना घरपोच मिळणार त्याबरोबर वर्गणीदारांना भेटवस्तु पण मिळणार आहेत. त्यासाठीच्या योजना पण या अंकात दिल्या आहेत त्याचा लाभ घ्या आणि आमचे वर्गणीदार व्हा.

याशिवाय पुणे महापालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेतच. त्यामुळे नव्या प्रभाग रचनेनुसार नव्या नगरसेविकांचे स्वागत करण्यासही आपण सज्ज राहूया.

•••

### वाचक-मानस...

**गेल्या दोन वर्षात लोकप्रियतेत वाढ झालेल्या, महिलांनी महिलांसाठी चालवलेल्या 'बिइंग वुमन' या पाक्षिकासाठी केवळ लेखक-लेखिका लिहू शकतात असे नाही; तर आता प्रत्येक अंकामध्ये वाचकांच्या प्रतिक्रियांना आम्ही स्थान देणार आहोत. आपली प्रत्येक अंकाबद्दलची प्रतिक्रिया १०० शब्दांमध्ये आपल्या फोटोसह 'बिइंग वुमन' च्या मेल आयडीवर अवश्य पाठवा.** editorial@thebeingwoman.com

## वेद्कालीन स्त्रिया : लेख १



**स्वाती यादव, पुणे**
editorial@thebeingwoman.com

भारतीय संस्कृतीचे अधिष्ठान, मानव जातीचा आद्य धर्मग्रंथ भारतीयांच्या सांस्कृतिक अस्मितेचे आद्य अधिष्ठान म्हणून 'ऋग्वेद' हा ग्रंथ साऱ्या जगात अद्वितीय मानला जातो. पंचमहाभूतात्मक विश्वाची आणि त्यामधील जीवसृष्टीची निर्मिती करणाऱ्या अनादि-अनंत परमेश्वराच्या अगाध कर्तृत्वाने प्रभावित होऊन प्रगल्भ वृत्तीच्या आत्मसाक्षात्कारप्राप्त ऋषींना स्फुरलेली कवने म्हणजेच वेदवाणी होय.

भारतीयांची परंपरा वैचारिक आहे आणि त्या परंपरेचा उगम आणि मूळ त्यांच्या आर्यत्त्वात म्हणजेच ऋग्वेदात आहे हे जर्मन प्राच्यविद्यापंडित फ्रेडरिक मॅक्समुलर यांनी सिद्ध केले आहे.

उत्कटता, भव्यता, दिव्यता, वैचारिक वैभव आणि गूढता तसेच मानवाचे भौतिक आणि पारमार्थिक सामर्थ्य या साऱ्यांचे अद्वितीय उन्मेष ऋग्वेद या मानवाच्या आद्य धर्मग्रंथात घडत असल्याचा साक्षात्कार मॅक्समुलर यांनी पाश्चात्त्य आणि पौर्वात्य जगास घडवला. दीर्घकालीन विचार प्रक्रियेने, मननाने म्हणजेच तपाने स्फुरलेल्या कल्पनांना ऋग्वेदात मंत्र असे म्हटले आहे. समाजधारणा, धर्म आणि ज्ञानाच्या मूलतत्त्वांचा अविष्कार घडवणे हेच ऋग्वेदाचे उद्दिष्ट आहे. यामुळेच वेदांना वेदत्त्व प्राप्त झाले. तप:सामर्थ्याने प्रकट केलेले हे सिद्धांत अलौकिक आणि समाजोपयोगी असल्यामुळेच त्यास 'ईश्वरी वाङ्मय' असे म्हटले गेले. स्वार्थविहीन, सत्तालोभ नसलेले आणि प्रसिद्धी पावण्याचा हेतू नसलेले हे धर्मग्रंथ म्हणूनच हजारो वर्षांपासून टिकून राहिले आहेत.

तप:सामर्थ्याने ब्राह्मण बनलेल्या विश्वामित्र गृत्समदासारख्या क्षत्रिय ऋषींची, मंत्रकर्त्या ऋषींमध्ये वसिष्ठ वामदेवांसदृश्य ब्राह्मणांप्रमाणेच पृथु वैन्य, मनु वैवस्वत, मांधातृ यौवनाश्व, सुदास आणि दिवोदास सदृश्य चक्रवर्ती क्षत्रिय सम्राटांचा, गंधर्वांचा, वैश्यांचा, राक्षसांचा त्याचप्रमाणे अपाला, घोषा यासारख्या ब्राह्मण स्त्रियांप्रमाणेच लोपामुद्रा या क्षत्रिय राजकन्येला, सरमेसदृश्य देवशुनीला आणि जरितृसारख्या शार्ङ्ग पक्षिणीलाही ब्रह्मवादिनी मानले आहे. समाजाच्या सर्व थरातील व्यक्तींच्या, स्त्रियांच्या इतकेच नव्हे तर नाग, सर्प, मत्स्य, पणि आदी लोकांच्या मंत्रांचा यात सन्मानपूर्वक समावेश केलेला आहे.

चारही वेदांमध्ये असे ज्ञान सामावलेले असून यातील स्त्रियांचे स्थान निश्चितच महत्वाचे होते हे वाचनानंतर समजते.

स्त्रियांच्या स्वाभिमानाचा तसेच त्यांच्या स्वत्वाचा रक्षक असा तो समाज स्त्रियांच्या विकासाला पाठिंबा देणारा आणि स्त्रियांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असणारा होता. विदुषी कन्या जन्माला यावी म्हणून प्रार्थना आढळतात. तसेच स्त्रीने स्वत: आपला वर शोधल्याचे उल्लेख आढळतात. विवाह न झाल्यास मुली पित्याकडे आजन्म राहू शकत होत्या तसेच त्यांना पित्याच्या संपत्तीतील वाटाही मिळत असे.

'जायेदस्तम' म्हणजेच पत्नी हेच गृह असते अशा वचनांवरून स्त्रियांना घरात मोठा मान होता हे दिसते. स्त्रियांना चांगल्या प्रकारे शिक्षण देण्यात येई. काही स्त्रियांनी ऋग्वेदातील सूक्तांच्या रचना केल्या आहेत. त्यांना ऋषिका म्हणत. विवाहसुक्तसुद्धा ऋग्वेदात स्त्रीरचित आहेत. अशा २७ ऋषिकांचा किंवा ब्रह्मवादिनींचा उल्लेख 'शौनकाच्या बृहद् देवता' या ग्रंथात आढळतो.

विवाह हा स्त्रीच्या आयुष्यातील वळणबिंदू. जाणून घेऊ पुढीललेखात तेजस्वी 'सूर्या' ह्या ब्रह्मवादिनीबद्दल जिने विवाह संस्कारांतील मंत्र रचले आहेत.





## डॉ. अनिल अवचट यांच्या बरोबरची एक आठवण



**अंकिता भिडे, पुणे**
editorial@thebeingwoman.com

लहानपणापासून मी अनिल अवचटांविषयी खूप ऐकले होते, माहिती होते त्यांच्याविषयी, त्यांच्या सामाजिक कार्याविषयी, पक्षीनिरीक्षणाविषयी.

असेच काही कारणाने त्यांच्या घरी जाण्याचा योग आला. मनात खूप कुतुहूल होते की अशी ही जी भन्नाट लोकं असतात, जगावेगळी लोकं असतात ना, त्यांचे घर कसे असेल, कसे वागत असतील ते दैनंदिन आयुष्यात. मी जाऊन बसले. त्यांनी खरंच खूप मनापासून हसून स्वागत केले आमचे. माझ्या मनात खूप धाकधूक होती एवढया मोठ्या व्यक्तीला भेटत आहे. काय बोलू? कसे बोलू? कोणती आठवण सांगू वगैरे वगैरे. पण ते इतके मोकळेपणाने, इतक्या विषयावरती गप्पा मारायला लागले की माझ्या मनातली धाकधूक कुठल्याकुठे पळाली. अगदी आमच्यातलेच एक होऊन गप्पा मारायला लागले.



डॉ. अनिल अवचट

त्यांचे घर न्याहाळत होते मी, कसे आहे. काहीतरी वेगळेपणा हा जाणवलाच. कारण असाधारण व्यक्तीचे घर होते ना. मग सर्वसाधारण कसे असणार .

माझी नजर त्यांच्या बासरीच्या बंचकडे गेली. आपण एखाद्या मोठ्या फुलदाणीमध्ये फुले ठेवू तसेच एका फुलदाणीमध्ये एका टोकरीमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या बासऱ्या ठेवल्या होत्या. कमीत कमी ३००-४०० बासऱ्या तर नक्कीच असतील. खूप निराळ्या आणि सुंदर होत्या त्या.

एक कुतुहूल म्हणून मी विचारले इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या बासऱ्या का? त्यांनी सांगितले, 'मी पक्षी निरीक्षणासाठी जेव्हा जात असतो तेव्हा या बासऱ्या घेऊन जातो. या सर्व वेगवेगळ्या बासऱ्या आहेत ना ते पक्ष्यांशी संवाद साधायचे साधन आहे. मी या बासऱ्या वाजवून त्यांच्याशी संवाद साधत असतो. त्यांना बोलावत असतो.' पक्षांना या प्रत्येक बासरीची धून कशी कळत असेल? कसे ते त्या धुनेच्या मागून येत असतील आणि माना डोलावत असतील माहीत नाही पण त्या पक्षांना आपलेपणा नक्कीच जाणवला असेल. कोणी आपलेच आपल्याला बोलावत आहे असे वाटले असेल. पक्षांची भाषा अवचटांना नक्कीच कळाली होती, कृष्णाला कळाली तशीच.

मला विचारले त्यांनी, 'लग्न झाले आहे का तुझे? करणार आहेस ना? नाहीतर आजकाल तुम्ही मुले यापासून पळत असता. तुम्ही आजकालची मुले करिअरला जास्त महत्व देता, आधी सेटल होऊ मग बघू असे म्हणत असत. पण करिअर आणि लग्नाचा उत्तम समतोल साधता येतोच की...' मी ऐकत होते सगळे. असे कोणीतरी जबाबदारीने, हक्काने सांगत आहे, आवडते मला. आपण फक्त ऐकायचे असते ते.

मी म्हणाले,' हो करणार आहे ना. बघू मनासारखे मिळाले की.' तर ते लगेच म्हणाले, 'नक्की मिळेल तुला. तुला तुझ्या मनासारखाच मिळेल. तू इतकी छान, हसरी आणि मोकळी आहेस. तुला तुझ्या मनासारखाच मिळेल. माझे भरपूर आशीर्वाद आहेत तुला.' खरंच आपल्याला असे मनापासून आशीर्वाद देणारे हवे असतात. ज्या कामासाठी आम्ही आलो होतो ते झाले. पुन्हा काही गप्पा आणि आम्ही निघालो.

अशा या व्यक्तिमत्वाला भेटून परत जाताना त्या वास्तूतून परत जाताना, खूप काहीतरी वेगळे जाणवत होते. एक आनंद जाणवत होता. आपल्याला कळून जाते की अशा व्यक्ती असामान्य का असतात ते.

## सहा दशकांचा स्वर

संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री विदुषी कीर्ती शिलेदार यांचे २२ जानेवारी २०२२ रोजी दु:खद निधन झाले.

कीर्ती शिलेदार यांचा अल्प परिचय. जन्म - १६ ऑगस्ट १९५२ पुणे येथे. वडील जयराम शिलेदार आणि आई जयमाला रंगभूमीवरील गायक व नट असल्यामुळे संगीत व अभिनय यांचे संस्कार त्यांच्यावर लहानपणीच झाले. कीर्ती शिलेदार यांना वडील जयराम आणि आई जयमाला शिलेदार यांच्याकडून कलेचा वारसा मिळाला.

वयाच्या दहाव्या वर्षी शिलेदारांच्या 'त्रिपात्री' 'सौभद्र'पासून कीर्ती शिलेदारांचे संगीत रंगभूमीवर पदार्पण झाले. 'संगीत सौभद्र' या नाटकातील नारदाची भूमिका त्यांनी प्रथमच केली आणि रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. संगीत आणि अभिनय याचे धडे घेत असतानाच आबासाहेब गरवारे महाविद्यालयातून मराठी या विषयातील 'बी.ए.'ची पदवीही कीर्ती शिलेदार यांनी मिळविली. विद्याधर गोखल्यांचे 'स्वरसम्राज्ञी' हे खास शिलेदारांसाठीचे नाटक होते. यातील तमाशातील मैनेची भूमिका अत्यंत गाजली. तमाशातल्या मैनेपासून शास्त्रीय संगीत गाणाऱ्या घरंदाज गायिकेपर्यंतच्या अनेक छटा दाखविण्यासाठी कीर्ती शिलेदारांनी प्रचंड मेहनत घेऊन ही भूमिका ताकदीने सादर केली. त्यांनी वयाच्या दहाव्या वर्षापासून विविध संगीत नाटकांचे चार हजारांहून अधिक प्रयोग सादर केले होते. देशविदेशात संगीत नाटकांचे प्रयोग, नाट्यपदांच्या मैफली, सप्रयोग व्याख्याने त्यांनी दिली. पारंपरिक संगीत नाटकांप्रमाणेच स्वरसम्राज्ञी, अभोगी, मंदोदरी आदी वेगळ्या धाटणीची नाटकेही त्यांनी आपल्या स्वराभिनयाने गाजवली होती. विद्याधर गोखलेंच्या 'स्वरसम्राज्ञी' या नाटकाच्या निमित्ताने कीर्ती यांना नीळकंठबुवा अभ्यंकर गुरु म्हणून लाभले. अभ्यंकरबुवांच्या तालमीत वाढलेल्या कीर्ती शिलेदार शास्त्रीय संगीताबरोबरच नाट्यसंगीत, ठुमरी अशा विविध संगीत प्रकारांत तयार झाल्या. आकाशवाणीच्या राष्ट्रीय संगीत सभेतूनच दोनदा त्यांचे गायन प्रसारित झाले. त्यांच्या १९०० च्या आसपास मैफली झाल्या.



कीर्ती शिलेदार

अनेक जुन्या संगीत नाटकांतून त्यांनी भूमिका केल्या. रुक्मिणी, सुभद्रा, मंथरा, द्रौपदी, वसंतसेना, रेवती अशा अनेक भूमिकांमधून त्यांनी संगीत रंगभूमीवर आपला ठसा उमटवला. रंगतदार, ढंगदार गायकीबरोबरच त्यांचे २ लयीवरदेखील प्रभुत्व दिसून येई. तबला व पखवाज वाजवण्यातही त्या निपुण होत्या.

कीर्ती शिलेदारांनी २७ नाटकांतून ३४ भूमिका केल्या असून साडेचार हजारांवर संगीत नाटकांचे प्रयोग केले. दीप्ती भोगले (लता शिलेदार) या त्यांच्या ज्येष्ठ भगिनींच्या संगीत नादलुब्ध 'मी' आणि 'संगीत चंद्रमाधवी' या दोन्ही नाटकांचे संगीत दिग्दर्शनही कीर्ती शिलेदार यांनी केले. पारंपरिक संगीत नाटकांचा विचार आणि बदलत्या काळानुसार नावीन्याचा अंतर्भाव त्यांच्या संगीत नाटकात आणि संगीतातही दिसतो. 'चंद्रमाधवी' या नाटकाच्या संगीतासाठी त्यांना 'झी'चा 'सर्वोत्कृष्ट संगीत' पुरस्कार मिळाला होता. कीर्ती शिलेदारांनी 'स्वर-ताल-शब्दसंगती' हा संगीतातील शब्दार्थाचे आणि काव्यार्थाचे महत्त्व सांगणारा शोधनिबंध लिहिला. 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' तर्फे विविध भाषक विद्यार्थ्यांकडून त्यांनी हिंदी भाषेतून नाट्यगीते गाऊन घेतली. एन.एस.डी. तर्फे झालेल्या 'एकच प्याला'च्या प्रकल्पामध्येही त्यांचा सहभाग होता. तसेच 'संगीत शारदा' या नाटकाचा हिंदी नाट्यांशही त्यांनी सादर केला. संगीत नाटक अकादमीच्या समितीवरही त्यांनी पाच वर्षे काम केले होते. नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले.

कीर्ती शिलेदारांना महाराष्ट्र शासन पुरस्कृत 'बालगंधर्व' पुरस्कार (२००९), नाट्यदर्पण रजनीचा 'नाट्यव्रती' सन्मान (१९९९), पुणे महापालिकेचा 'बालगंधर्व' पुरस्कार (२००६) असे अनेक पुरस्कार मिळाले होते. काही काळापूर्वी त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारा 'मम सुखाची ठेव' हा लघुपट त्यांच्या भगिनी दीप्ती भोगले यांनी प्रदर्शित केला होता. कीर्ती शिलेदार यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

कीर्ती शिलेदार यांची ध्वनिमुद्रित झालेली नाट्यगीते आणि त्या नाटकांची नावे - अहो इथं मांडिला (संगीत स्वरसम्राज्ञी), एकला नयनाला विषय (संगीत स्वयंवर), एकलीच दीपकळी मी (संगीत स्वरसम्राज्ञी), कशि केलीस माझी दैना (संगीत स्वरसम्राज्ञी), दयाछाया घे निवारुनिया (संगीत एकच प्याला), नरवर कृष्णासमान (संगीत स्वयंवर), नाही मी बोलत (संगीत एकच प्याला), नृपकन्या तव जाया (संगीत स्वयंवर), पांडवा सम्राट पदाला (संगीत द्रौपदी),पावना-वामना-या मना (संगीत सौभद्र), पाही सदा मी (संगीत मानापमान), बलमा आये रंगीले (संगीत स्वरसम्राज्ञी), भक्तांचिया काजासाठी (संत अमृतराय महाराज यांचा अभंग), मम सुखाचि ठेव (संगीत स्वयंवर),येतील कधी यदुवीर, रे तुझ्यावाचून काही (संगीत स्वरसम्राज्ञी), लाजविले वैर्यांना (संगीत द्रौपदी), सखे बाई सांगते मी (रंगात रंगला श्रीरंग), हरीची ऐकताच मुरली (रंगात रंगला श्रीरंग).

**- टिम बिइंग वुमन**

# विलक्षण प्रेमकथा



**अपर्णा गुळवणी, कोल्हापूर**
editorial@thebeingwoman.com

नल-दमयंती, एक विलक्षण कथा. दोन व्यक्तींची, एका सोनेरी धाग्यात गुंफलेली. प्रबळ इच्छाशक्ती आणि विश्वासाच्या जोरावर अनेक दुःख, विरह सहन करून पुन्हा एकदा एकत्र येऊन आयुष्याला नव्याने सुरुवात करणारी ते दोघे नल आणि त्याची भार्या दमयंती.

ही कथा जीने अनेक कवी, लेखक आणि कलाकारांना भुरळ घातली. ती सुरु होते महाभारतात वानपर्वामध्ये. राजा युधिष्ठिर आपले राज्य गमावल्यावर अतिशय कष्टी होऊन बसलेला असतो आणि ब्रिहदश्व ऋषींना म्हणतो, 'इतिहासात असा कोणताही राजा नसेल जो माझ्याएवढा दयनीय अवस्थेत असेल. राज्य, पत्नी सगळ्यांना पणाला लावले आणि सर्वस्व हरलो.'

ते म्हणतात की, 'हे राजा तुझ्यापेक्षा दुर्दैवी, असा एक राजा होऊन गेला' आणि त्याला कथा सांगू लागले... दमयंती, विदर्भ देशच्या भीम राज्याची कन्या. एका सोन्याच्या वर्णाच्या हंसाकडून तिने नलराजाचे गुण ऐकले व त्या हंसामार्फत तिने आपले प्रेम नलाला कळविले. राजा भीमाने दमयंतीच्या स्वयंवर सोहळ्याचे आयोजन केले. त्यात इंद्र, वरुण, अग्नी व यम आदी अनेक देवतांना आमंत्रीत केले. दमयंतीशी विवाह करण्यास देवादिकांसह अनेक जण उत्सुक होते. चारही देव स्वयंवरामध्ये नल राजाचे रूप धारण करून आल्याने पाचही जण नलासारखे दिसत असल्याने दमयंती गोंधळली. परंतू एकाएकी तिला उमजले की या पाचही जणांमध्ये फक्त एकच अशी व्यक्ती आहे की ज्याचा गळ्यातला फुलांचा हार कोमेजत आहे, एकालाच घाम यतो आहे आणि एकाचीच सावली दिसते आहे. सर्व देवांना अव्हेरून ती नलाला माळ घालते .

दमयंतीच्या प्रेमाची कथा विस्तृतपणे वर्णन करणारी अनेक काव्य आहेत. कालिदासाचे नलोदय, नैषध आणि श्रीहर्ष ज्यामध्ये १३५ श्लोक आहेत, दमयंती आणि हंसांमधला संवाद वर्णन केला आहे आणि दमयंती त्या शुभ्र पक्षांकडून नल राजाची स्तुती ऐकून प्रेमात आकंठ बुडून जाते.

विवाहानंतर नल दमयंती दोन सुंदर मुलांचे पालक होते आणि सर्व सुरळीत होत असतानाच एक घटना अशी घडते की सर्व होत्याचे नव्हते होऊन जाते. राजा नल आपल्या चुलत भावाबरोबर द्यूत खेळावयास बसला. दमयंतीला जाणीव होती की याचा परिणाम खूप वाईट होणार आहे पण तिला याचीही जाणीव होती की आपला पती कुठल्यातरी दुष्ट शक्तीच्या विळख्यात सापडला आहे आणि जे काही घडणार आहे त्याला सामोरे जाण्याशिवाय गत्यंतर नाही.

नल सर्वस्व हरला आणि नेसत्या वस्त्रानिशी तो आणि दमयंती राज्याबाहेर पडले. खायला अन्न नाही, शिकार करायला आयुधे नाहीत. त्यामुळे होणारे आपल्या पत्नीचे हाल त्याला पाहवत नाहीत आणि एका रात्री तो तिला जंगलात एकाकी सोडून जातो. ह्या आशेवर की ती स्वगृही परत जाईल. होतेही तसेच पण दमयंतीला चैन पडत नव्हते. आपल्या प्रेमावरचा प्रबळ विश्वास, स्वतःची इच्छाशक्ती यापेक्षाही जास्त तिला मानवी जीवनाची समज होती. तिला नक्की काय ते कळत नव्हते पण आपल्या पतीला कुठल्यातरी अनिष्ट शक्तीच्या विळख्यात आहे हे तिला उमजले होते. त्या शक्तीने तो मोहित झाला होता. तर्कशुद्ध विचार करणे त्याला जमत नव्हते त्यामुळे त्याला परिस्थितीसाठी दोष देण्यात काही अर्थ नव्हता. ३ वर्ष ती सतत नलाच्या शोधात होती. एक दिवस तिला बातमी समजली की अयोध्येचा राजा ऋतुपर्णकडे बाहूक नावाचा एक सारथी आहे, जो वाऱ्याच्या वेगाने सारथ्य करतो. तिला जशी खात्री पटते की हाच आपला पती आहे ती स्वतःचे दुसरे स्वयंवर करण्याची इच्छा व्यक्त करते कारण पतीला परत मिळवण्याचा तो एकच मार्ग दिसत असतो. त्याप्रमाणे नल येतोही पण ऋतुपर्ण राजाचा सारथी होऊन बाहूक होऊन. अतिशय कुरूप आणि बुटका कोणालाही न ओळखता येणारा.

ही त्याची अवस्था कर्कोटक या सर्पाच्या दंशाने झाली असते. जेव्हा सर्व देवांना अवहेरून दमयंतीने नलाला माळ घातली तेव्हाच कलिने ठरवले होते की नलाचे आयुष्य उध्वस्त करायचे. पण राजा नल एवढा शुद्ध अंतःकरणाचा होता की १२ वर्ष वाट पाहिल्यावर कलिला ती संधी मिळाली. नलाचे आयुष्य उध्वस्त झाले.

परंतु, दमयंतीची ओळख पटल्यावर, ती पुन्हा एकदा त्यालाच वरते. नल दमयंतीच्या एकमेकांवरील प्रेमाने आणि विश्वासाने ते परत एकत्र आले. ह्या कथेत जीवनातील अदृश्य शक्तींच्या खेळाचे सखोल आकलन होते. हे दुष्ट प्राणी एखाद्याच्या आयुष्याची अचानक पकड घेतात. तो माणूस जो त्या दिवसापर्यंत पवित्रता आणि निष्ठेचा आदर्श होता त्याच्या जीवनात सर्व प्रकारची संकटे आणतात. एखाद्याच्या आयुष्यात असे प्रसंग येतात तेव्हा ती व्यक्ती बऱ्या वाईटाचा विचार न करता निर्णय घेऊन अधोगतीला जाऊ शकते.

त्याही परिस्थितीत, एखाद्याला विनाशापासून वाचवू शकतो. गरज असते ती एका साथीदाराची, सक्षम मनाची आणि एकमेकांवरील अतूट प्रेमाची.






## आवर्जून पहावी अशी

# बारा मोटेची विहीर : लिंब, सातारा

देश-विदेशात मनसोक्त भटकंती करण्याची प्रत्येकाचीच इच्छा असते. परंतू अशा पर्यटनासाठी येणारा खर्च आणि लागणारा वेळ पाहता आपल्यापैकी प्रत्येकालाच ते शक्य होईल असेही नाही. अशांसाठी पुण्याच्या जवळपास एक किंवा दोन दिवसात करता येण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत. या भ्रमंतीमध्ये कुटुंबियांसोबत आनंदाचे चार निवांत क्षण तर मिळतातच पण हसत खेळत इतिहासाची तोंडओळखसुद्धा होते. असेच एक आवर्जून पहावे असे ठिकाण म्हणजे लिंब गावातली बारा मोटेची विहीर.

पुण्याहून साताऱ्याकडे जाताना डाव्या हाताला नागेवाडी फाटा लागतो. तिथून लिंब शेरी गावाच्या दिशेने गेल्यास बारा मोटेच्या विहीरपर्यंत पोचता येते. आत शिरल्यावर जोपर्यंत आपण विहिरीच्या अगदी जवळ जात नाही तो पर्यंत इथे विहीर असावी अशी कल्पनाही येत नाही. ही विहीर शके १६४१ ते शके १६४६ या दरम्यान सौ. वीरुबाई यांनी बांधल्याचा उल्लेख या विहिरीवर असलेल्या शिलालेखामध्ये सापडतो. पृष्ठभागापासून (जमिनीपासून) काही पायऱ्या उतरून गेल्यावर विहिरीचे दर्शन होते. ११० फूट खोल आणि ५० फूट रुंद अशी ही विहीर अष्टकोनी आकारात आहे. इतर विहिरींपेक्षा एकदम वेगळ्या प्रकारची रचना असलेली ही विहीर सध्या पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. तीन स्तरांवर या विहिरीची रचना करण्यात आली आहे. सर्वात खालच्या स्तरावर खोल विहीर असून तिथून दोन्ही हाताला वर जाणारे अंधारे जिने दिसतात. या जिन्याने वर जाऊन आपण एका महाल वजा खोलीत पोचतो. या खोलीतील खांबावर सुंदर नक्षीकाम आहे तसेच फुलापानांच्या नक्षी बरोबरच हनुमान, गणपती, अश्वारूढ व गजारूढ योध्यांची चित्रे कोरलेली आहेत. या खोलीतून एका बाजूला विहिर तर दुसऱ्या बाजूला आत येण्याच्या पायऱ्या दिसतात. या खोलीतून एक पाच सहा पायऱ्या चढून गेल्यावर आपण परत पृष्ठभागी येतो. इथे चढून आल्यावर एक दगडी सिंहासन असून त्याच्या दोन्ही बाजूला राजाच्या अधिकाऱ्यांसाठी अथवा सभेसाठीची बैठक व्यवस्था आढळते.



श्रीमंत शाहू महाराजांनी भारतभरातून विविध जातींची आंब्याची रोपे आणून इथे लावली होती व त्या आमराईला पाणी पुरवठा करण्यासाठी या विहिरीची रचना करण्यात आली. प्रत्यक्ष पंधरा मोटेची ही विहीर असून बारा मोटेतून पाण्याचा उपसा होत होता व तीन मोटा राखीव होत्या.


या विहिरीची माहिती कळल्यामुळे इतिहासतज्ञ तसेच भटकंतीची आवड असलेले अनेक पर्यटक इथे भेट देतात. वैशिष्ट्यपूर्ण अशा वास्तूरचनेमुळे ही विहीर छायाचित्रकारांनाही तितकीच भुरळ घालते.

सध्या विहिरीसाठी रु.१० (दहा) असे तिकीट ठेवण्यात आले आहे. या विहीरीला भेट देण्यासाठी अजून एक उत्तम रस्ता आहे. त्यासाठी सातारा ओलांडून पुढे जाऊन डावीकडे वळून जाता येईल.

विहीर पाहायला व उत्तम छायाचित्रे काढायला साधारण एक तासाचा अवधी लागतो. त्यामुळे एका दिवसात तुम्ही सातारा किंवा आसपासची महत्वाची स्थळे जसे की चाफळ, वाई, पाचगणी व सज्जनगड असेही करू शकता.

**रवी वर्णेकर, लिंब, सातारा**
editorial@thebeingwoman.com
















**Regd. Newspaper - RNI No. MAHMAR/2019/78753**
(Decl. No. SDM/Pune City/SR/30/2020)
Licence to post without pre-payment of postage No.
Postal Reg. No.
Publication Date : 01/02/2022
Posting 'Every Fortnight' at

To,

Postal Stamp

**If undelivered, please return to -**
**ABSOLUTE MEDIA SOLUTIONS,**
A-24, Sadgurukripa Bldg, Gopinath Nagar, Kothrud, Pune 411038, INDIA
Contact : 9850944219

'बिइंग वुमन' हे पाक्षिक मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क 'सी' सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे - ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११, संगिता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे - ४११००१ येथून प्रसिध्द केले. संपादक - रोहिणी अरुण वांजपे (प्रसिध्द केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही).
'Being Woman' Fortnightly publication is owned, Printed and Published by Rohini Arun Wanjpe, printed at Ekvira Publicity, A 12, Nikhil Park C Soc., Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051 and published at Flat No. C11, Sangita CHS, Tadiwala Road, Pune - 411001. Editor - Rohini Arun Wanjpe.

## मनामनातलं...

१
आपलं नातं
जोडलेलं नव्हे, जुळलेलं
टिकवलेलं नव्हे, टीकलेलं
समज गैरसमजातून अलवार निसटलेलं,
आपलं नातं.
कधी डोळ्यांमधले अश्रू होऊन
घळाघळा ओघळलेलं,
कधी राग राग होऊन, नतमस्तकात गेलेलं,
तरीही शेवटी गालावरचे हसू होऊन,
चाफ्यासारखं फुललेलं,
अत्तराप्रमाणे न दिसणारं,
तरीही दरवाळणारं,
आपलं नातं... जपून ठेवशील ना?
तुझ्या माझ्या उशीखाली!

२
समोर तुला बघता वाटे...
माझेच माझ्या समोर असावे
तुझीया डोळ्यात हरवून मी
माझ्या आत डोकवावे...
खोल खोल तुझ्या डोळ्यात
बुडत जात असताना
आतून तितक्याच हल्क्याने मी
सहज तरंगावे
समोर तुला बघता...
सरळ साधा गव्हाळ वर्ण
तुझ्या हाताचा मला लागता
कितीतरी जन्म मी
निर्भयतेने ओलांडावे,
समोर तुला बघताच...

३
बातो बातो मे जबाब मिल जाते है
सवालों से पहले
आखों आखों मे मंजिले मिलती है
सफर से पहले
इसी सिलसिले मे हम तेरे हो गए
किसी जीक्र से पहले
अब... अब जबाब दे भी दे
मेरे मांगने से पेहले

- ऐश्वर्या खळदकर

## प्रेमाचा मोरपिशी दिवस पान १ वरून...

एकच ताल, एकच छंद, एकच काव्य ते म्हणजे प्रेम...!


प्रेमात हरवलेले जीव असे तहानभूक विसरून स्वमग्न असतात. त्यांच्या अवघ्या अस्तित्वात एक बहरलेला ऋतू असतो. वात्सल्याच्या रसाने ओथंबलेले हे बहर नेहमीच सुंदर दिसतात. फुलं सडा होऊन अंगण सजवतात तर सूर्य क्षितिजावर केशरी उधळण करतो. मेघांची चिंब बरसात मातीला सुखावते तर गाभाऱ्यातली घंटा अनंताच्या पायी आपला मधुर घंटारव समर्पित करते. ते तितकच असतं तिच्याजवळ, तेही ती मुक्त उधळते. चंद्र त्याच्या किरणांनी धरेवर अखंड सुधारस पाखडतो. तिच्या तापलेल्या कायेला मोहवतो, शांतवतो... हे प्रेमच ना..!
म्हणून प्रेम करावं मीरेसारखं,
कधी चंद्रसूर्यासारखं
ज्ञानेश्वरांसारखं....!!

कार्य तुमचे, मंडप आमचा
**एस. जी. रानडे आणि कं.**
मंडप फर्निचर्स कॉन्ट्रॅक्टर्स अॅन्ड डेकोरेटर्स
One Stop Solution...
❖ Birthday
❖ Family Events
❖ Society Events
❖ Corporate Events
2/13, Gopinath Nagar, Nr. Gandhi Bhavan, Kothrud, Pune - 38, Mo : 98230 75728

## आरोग्य स्त्रीत्वाचे

मी यापूर्वी जेव्हा रडत असे तेव्हा मला कोणीच असे जवळ घेऊन शांत केले नाही, असे २५ वर्षांची प्रिया म्हणाली. प्रिया एक फॅशन डिझायनर आहे. गेली अनेक वर्षे ती डिप्रेशन म्हणजेच नैराश्याशी लढा देत होती. नैराश्यामुळे रडू आल्यावर जवळ घेतल्याने व्यक्तीला सुरक्षित वाटते. आजच्या काळात आपण हे विसरून गेलो आहोत.

खूपदा लोकांना डिप्रेशन म्हणजे काय? असा प्रश्न पडतो. तर या निराश भावनेची लक्षणे म्हणजे सतत रडू येणे, भूक मंदावणे किंवा खा-खा सुटणे, काहीही न करता एका जागी बसून राहणे अशी असतात. काही जणांमध्ये जगण्याची उमेद संपलेली दिसते, कुठल्याच ध्येयाचा पाठपुरावा होत नाही, आत्मविश्वास गमावला जातो. सगळ्यात टोकाचे लक्षण म्हणजे आत्महत्येचे विचार किंवा प्रत्यक्ष प्रयत्न.




सामान्य माणसाला ही लक्षणे नैराश्याची नव्हे तर निव्वळ आळस, झोपाळूवृत्ती, कामचुकारपणा वाटू शकतात. मला घरच्यांनी कधी ओरडून, समजावून यातून बाहेर काढायचा प्रयत्न केला. मी शिकायला परदेशी गेले तर तिथे एकटेपणा, जरासे अपयश देखील मला सहन होईना. मला कोणामध्ये मिसळायची इच्छा होईना. असेही ती म्हणाली.

शरीराला झालेली इजा किंवा जडलेली व्याधी आपण समजावून, गप्पा मारून, हवा पालट करून बरी करू शकत नाही. मात्र मनाला झालेली इजा, जडलेली व्याधी ही योग्य त्या उपचारातून बरी होते. योग्य ती औषधे, काऊंसेलिंग आणि हिलींग यांची नितांत गरज असते.

हे डिप्रेशन आले कुठून? घरचं सगळं व्यवस्थित आहे, पैशाला कमी नाही, सुख सोयी आहेत, परदेशी शिक्षण झाले आहे, तर नैराश्य आले कुठून? असे वाटणे साहजिक आहे.

प्रियाचच बघा; लहानपणी घरात बघितलेले वाद, मोठ्या माणसांची भांडणे, चढलेले आवाज यांचा लहान प्रियावर खूप विपरीत परिणाम झाला. कधीकधी तर घरातली तिची काकू तिच्यावर या भांडणांचा राग काढायची. छोट्यातली छोटी चूक सुद्धा तिला माफ नव्हती. फटके देणे, कोंडून ठेवणे, अबोला धरणे अशा स्वरूपाची तिला शिक्षा व्हायची. यामुळे, 'आपल्यातच काहीतरी कमी आहे, आपण कोणाला आवडत नाही व आपल्याला कधी यशस्वी होता येणार नाही' असा चुकीचा समाज प्रियाने करून घेतला होता.

आता मोठेपणी अपयशाची चाहूल जरी लागली तरी ती घाबरी व्हायची व नैराश्य डोके वर काढू लागायचे. आमच्या हिलींग, **REBT** आणि पुष्पौषधीच्या उपाययोजनेनंतर हळूहळू ती आनंदी दिसू लागली, गेलेला आत्मविश्वास परत आला. मोडलेला साखरपुडा विसरून तिने नवा जोडीदार शोधला. स्वत:चे बुटिक सुरु केले.

तर, सांगण्याचा उद्देश हा की आज समाजाला मनोरुग्णांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे खूप गरजेचे आहे. तरंच मानसस्वास्थ्याबद्दल बोलणे निषिद्ध राहणार नाही. जसे हार्ट अटॅक आणि डायबिटीजबद्दल आपण सहज बोलतो तसेच डिप्रेशन आणि एन्झायटी हे सुद्धा सहज वापरले जाणारे शब्द व्हायला हवे तरच आपण निरोगी आणि खऱ्या अर्थाने प्रगतीशील बनू.



**डॉ. नूपुर जोगळेकर, पुणे**
MBBS, Certified Nutritionist
Mobile : 98900 53837

लोकांच्या उदंड प्रतिसादामुळे स्पर्धेच्या मुदतीत वाढ

बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women
प्रस्तुत स्पर्धा
Valentine's Day Special
**गोष्ट पहिल्या प्रेमाची**

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात पहिलं प्रेम असतं. कोणाचं पहिलं प्रेम त्याची गाडी / घर / प्राणी एखादी वस्तू असंही असू शकत. तेव्हा चला या व्हॅलेंटाईन डे ला तुमच्या पहिल्या प्रेमाच्या आठवणी ताज्या करा आणि आम्हाला तुमच्या शब्दात लिहून पाठवा.

ज्यांना ज्यांना अजूनही गोष्ट पहिल्या प्रेमाची या स्पर्धेत भाग घ्यायचा राहिला आहे त्यांच्यासाठी ही खास संधी. लेख पाठवायची अंतिम तारीख आता **१० फेब्रुवारी २०२२**. तर मग चला आजच लेख लिहा आणि पाठवून द्या.

स्पर्धेचा कालावधी
15 जानेवरी ते 10 फेब्रुवारी
शब्द मर्यादा -
200 ते 250 शब्द
विजेत्यांना आकर्षक बक्षिसे*
आपले लेख पाठवा - editorial@thebeingwoman.com
आधिक माहितीसाठी संपर्क : +91-9822862255 | +91-8552857779
*t & c apply
BRANDSIS




वार्षिक वर्गणी
रु. ५२५/-
दिवाळी अंकासह
२४ अंक घरपोच
प्रत्येक सभासदास एक आकर्षक वेल्कम गिफ्ट

सिल्वर क्लब ग्रुप
दहा सभासद बूकिंगसाठी
रु. ४७५/- प्रत्येकी
एकूण रु. ४७५०/-
दहा सभासदांना एकाच पत्यावर अंक मिळतील.

गोल्ड क्लब ग्रुप
२५ किंवा त्यापेक्षा अधिक सभासद बूकिंगसाठी
रु. ४00/- प्रत्येकी
एकूण रु. १०००० /-
२५ सभासदांना दोन पत्यावर अंक मिळतील.

आजच सभासद व्हा व मिळवा
आकर्षक ऑफर्स व भेटवस्तु
- Discount Coupon by Prathamesh Resorts.*
- 30% Discount on Stitching by Pratibha Rachkar Couture.
- 30 min Relaxing Foot Massage at Four Fountains Spa.
*अटी लागु
G Pay accepted here
ABSOLUTE MEDIA SOLUTIONS
Pratibha Rachkar Couture
Four Fountains De-Stress Spa
+९१-९८२२८६२२५५ | +९१-८५५२८५७७७९ www.thebeingwoman.com
BRANDSIS